| MHKO130000222026 | आनंदा विठू सावंत इ.०१<br>विरुध्द<br>कोणीही नाही. |
|---|---|

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०१/२०२६ मधील नि.क्र १ वरील आदेश

१. प्रस्तुतचा चौकशी अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेकामी केलेला आहे.

२. अर्जदारांच्या कथनानुसार मयत पांडू शिवा सावंत हे अर्जदार क्र. १ व २ यांचे चुलते होते. मयत पांडू शिवा सावंत यांचा मृत्यू दिनांक १५/०२/१९९८ रोजी विना अपत्य झाला असून त्यांची पत्नी हौसाबाई पांडू सावंत या दि. १७/०१/२००६ रोजी मयत झाल्या आहेत. मयत पांडू शिवा सावंत यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत.

३. अर्जदारांच्या कथनानुसार, अर्जदार हे मयत पांडू शिवा सावंत यांचे सरळ कायदेशीर वारस असल्याने अर्जदार यांना गोरंबे, ता. कागल येथील स्थावर मालमत्तांचे सरकारी कागदोपत्री वारस नोंदणीकरीता सरकारी व निमसरकारी अधिका-यांकडून मरणोत्तर इतर लाभ मिळणेकरीता अर्जदार यांना मयत पांडू शिवा सावंत यांचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस दाखल्याची मागणी केली आहे. त्यानुसार अर्जदार यांना वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. नि.क्र. १ वरील आदेशानुसार अर्जदाराने दिनांक ०१.०२.२०२६ रोजी 'पुण्य नगरी' या वर्तमापत्रात जाहिर नोटीस प्रसिध्द केलेली होती. त्याची प्रत अभिलेखावर नि.क्र. ०७ वर दाखल आहे. सदर नोटीसीला अर्जदार हे मयत पांडू शिवा सावंत यांचे वारस असल्याबाबत कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदार क्र. १ आनंदा विठू सावंत यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र नि.क्र. १० वर दाखल केलेले आहेत. जाहीरनामा (नि.क्र. ०६), मयत पांडू शिवा सावंत यांचे मृत्यूच्या प्रमाणपत्राची मुळ प्रत तसेच पांडू शिवा सावंत यांच्या पत्नी हौसाबाई पांडू सावंत यांच्या मृत्युदाखल्याची प्रत, गावकामगार पोलीस पाटील मौजे गोरंबे, ता. कागल, जि. कोल्हापूर यांनी अर्जदार हे पांडूरंग शिवा सावंत यांचे वारस असलेबाबत दिलेला वारस दाखला, अर्जदार यांचे आधारकार्डची झेरॉक्स प्रत, तसेच इतर आवश्यक ती कागदपत्र अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेली आहेत.

५. अभिलेखावरील अर्जदारांचे कथन व कागदपत्र यांची पडताळणी केली असता अर्जदार हे मयत पांडू शिवा सावंत यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. अर्जास विहीत कालावधीमध्ये तसेच आजपर्यंत अर्जदारांच्या अर्जातील मागणीस कोणाचीही हरकत अथवा आक्षेप दाखल झालेला नाही. अर्जदारांचा पुरावा विना आव्हानात्मक राहिलेला आहे. अर्जदार यांनी ते मयताचे कायदेशिर वारस असल्याचे

न्यायालया समोर शपथेवर सांगितलेले आहे. पुराव्याचे प्रतिज्ञापत्र व दाखल कागदपत्रांवरुन अर्जदार हे मयत पांडू शिवा सावंत यांचे वारस असल्याचे शाबित होते. त्यामुळे अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, अर्जदारांच्या लाभात वारस दाखला देण्यास कोणतीही अडचण मला दिसून येत नाही. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहेः-

**आदेश**

१. अर्जदारांचा वारस प्रमाणपत्रासाठीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ व २ हे मयत पांडू शिवा सावंत यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांचे नावे बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चॅप्टर ८ चे रूल २, अन्वये वारस दाखला अर्जदार यांना (heirship certificate) योग्य त्या कोर्ट फी वर देण्यात यावा.

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.05.02 16:37:34 +05'30'

**ठिकाण - कागल** **(प्रणिता सुहास पाटील)**
**दिनांक – ०२.०५.२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, कागल.**